## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/१०/२०१७

### १) मुलीवर अत्याचार करुन बदनामी करण्याच्या उद्देशाने फोटो फेसबुकवर अपलोड केल्याने गुन्हा नोंद . :–

सन २०१५ पासुण ते ऑगस्ट २०१७ पर्यत यातील फिर्यादीचे आरोपी सोबत प्रेम संबंध असतांना सन २०१५ मध्ये आरोपीने फिर्यादीस जंगल शिवारात नेवुन तिला भिती दाखवुन तिचेवर जबरी अत्याचार केला तसेच वेळोवेळी व ईतर ठिकाणी फिर्यादीस नेवुन फोटो मोबाईवर व्हॉयलर करण्याची धमकी देवुन तिची बदनामी करण्याची भिंती दाखवुन जबरी अत्याचार केला, तसेच फिर्यादीसोबत काढलेले फोटो फिर्यादीचे बिना सम्मतीने फेसबुकवर फोटो अपलोड केल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७६(२)(एन),५०६. भांदवि. सहकलम (३)(२)(५)अजाजअप्रका सहकलम ६६(ई),६७(अ)माहिती तंत्रज्ञान कायदा सन २०००. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास एसडीपीओ साकोली श्री. डिसले हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

### २) घरातील लोखंडी कपाटातुन सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–

दिनांक २३/१०/२०१७ चे २१.३० ते २४/१०/२०१७ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी संजु विठ्ठल भुरे वय ३६ वर्ष, रा. पांढराबोडी हे भाऊबीज करीता घराला ताला लावुन गेले असता फिर्यादीचे राहते घराचे मागील दरवाज्याची कडीकोंडा तोडुन घरात प्रवेश करुन गोदरेज लोखंडी कपाटात ठेवलेले ४ सोन्याच्या अंगठया वजन ११.५ ग्रॅम, १ सोन्याचा गोफ १२ ग्रॅम, सोन्याची नाकातील नथ ४ ग्रॅम, सोन्याचे कानातील टॉप्स ३ ग्रॅम, सोन्याची एकदानी ज्यात ३५ मनी असलेली, सोन्याची १ दानी पाऊल तोळा, सोन्याची पांचाली ७ ग्रॅम, सोन्याचे कानातील टॉप्स २ ग्रॅम, सोन्याचे लॉकेट स्वास्थीक असलेले ३ ग्रॅम, व नगदी रोखरक्कम ९१,०००/–रु. असा एकुण २,२३,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चौहाण पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

### ३) घरातील नगदी पैसे व सोन्याचे मनी चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २३/१०/२०१७ चे २२.०० ते २४/१०/२०१७ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी चंद्रभान खोरकु वैरागडे वय ५७ वर्ष, रा. पांढराबोडी याचे घरी व ओमदेव सुखदेव भुरे यांचे घरी ते झोपले असता त्यांचे घराचे मागील दाराची कडीकोंडा काढुन आत प्रवेश करुन आलमारीत ठेवलेले फिर्यादीचे घरातील नगदी ३५,०००/–रु. ज्यात २,०००/–रु. चे ०५ नोटा व ५००/–रु. चे ५० नोटा व ओमदेव भुरे यांचे घरुन ०१ ग्रॅम, सोन्याचे मनी किंमती १६५०/–रु. व नगदी १५००/–रु. एकुण ३१५०/–रु. चा माल असा एकुण किंमती ३८,१५०/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कारंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) घरातील लॅपटॉप, सोन्या व चांदीच्या दागीण्याची चोरी :–**

दिनांक २१/१०/२०१७ ते २४/१०/२०१७ चे १०.३० ते १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीकांत विश्वनाथ सुखदेवे वय ३५ वर्ष, रा. फुले कॉलोनी भोजापुर हा नौकरी संदर्भाने नागपुर येथे गेला होता दुसऱ्या दिवशी परत आला असता घराचा समोरील दाराचा ताला तुटला दिसल्याने आत जावुन पाहीले असता घरात ठेवलेला १ लॅपटॉप केसर कंपनीचा व १ सोन्याचा गोफ १२ ग्रॅम, चांदीच्या पायपट्टया १५ तोडे असा एकुण ४०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) मुलांचे वस्तीगृहातुन नळाचे मिटर व वापरती सायकलची चोरी :–**

दिनांक २०/१०/२०१७ चे ०८.४५ वाजता दरम्यान यातील आदीवासी मुलांचे शासकीय वस्तीगृहात पिण्याचे पाण्या करीता नळाला लावलेले मिटर किंमती २,०००/–रु. व ०१ जुनी वापरती सायकल किंमती अंदाजे १,०००/–रु. असा एकुण ३,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी राजेन्द्र श्रावणजी ठाकरे वय ५७ वर्ष, रा. आदिवासी मुलांचे वस्तीगृह क्र. ०१ लाल बहादुर शास्त्री वार्ड भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक २२/१०/२०१७ ते २३/१०/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी शेखर तुळशिराम साकुरे वय ५२ वर्ष, रा. शुक्रवारी सुभाष वार्ड भंडारा याचा पुतण्याने आपले घराचे पोर्च मध्ये ठेवलेली हिरोहोंडा स्पलेन्डर प्लस काळया रंगाची सिल्वर पट्टा असलेली मोटार सायकल क्र. एमएच ३६ /ई ४९९१ किंमती २५,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) अवैध दारू अंडयावर धाडी . :–**

दिनांक २४/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व सिहोरा येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून ४५ लिटर हातभट्टी दारू+ १ मोटार सायकल किंमती ३३७००/–रु, चा माल जप्त करण्यात आला.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता